दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

epaper.katusatyanews.com
16 Sep 2024 - Page 3

# गौरी - गणपती उत्सवाच्या निमित्ताने ऋतुजा दत्तात्रय बिडकर हीच्याकडून 'सायबर सेक्युरिटी जनजागृती'

## उपक्रमाचे शहर पोलिसांकडून व सोलापूर करांकडून विशेष कौतुक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येतोय. गणेशोत्सवा पाठोपाठ गौरींचे आगमन सर्वत्र हर्षोउल्हासत करण्यात आले. गौरीच्या आगमना निमित्त विविध आकर्षक सजावट भव्य असा मंडप पंचपक्वनांचे पदार्थ अशी एकंदर लगबग दिसून आली. गणपती गौरी- उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ मध्ये MCA - II शिक्षण घेत असलेली ऋतुजा दत्तात्रय बिडकर हिने पुण्यश्लोक अहिल्यादेव होळकर विद्यापीठ व Quick Heal foundation च्या संयुक्त विद्यमाने सोशल मीडियावर हॅकर्सच्या मुळे वाढलेले गुन्हे संपुष्टात आणण्यासाठी व लोकांमध्ये याबाबत सुरक्षिततेचे जनप्रबोधन करण्यासाठी cyber security awareness हा उपक्रम समाजात प्रस्थापित करून लोकांनी सोशल मीडियाचा वापर करताना सावधानता बाळगावी हॅकर्सच्या कुठल्याही आमिषाला बळी पडू नये सोशल मीडियावर कुठलेही आर्थिक व्यवहाराची देवाण-घेवाण करू नये विशेषतः महिला /युवक/ युवतीनी दक्षता घ्यावी असा संदेश प्रस्थापित केला. या उपक्रमाला सोलापूरकरांचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचं शहर पोलिसांनी ही विशेष असं कौतुक केल. या उपक्रमासाठी ऋतुजा बिडकर हिने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सालाबाद प्रमाणे यंदाही गौरी गणपती उत्सवाच्या निमित्ताने बिडकर कुटुंबियांनी घेतलेल्या या अनोख्या उपक्रमाचा सर्व स्तरातून विशेष कौतुक केले जात आहे. याबाबत ऋतुजा बिडकर हिने सोशल मीडियावर वाढलेली गुन्हेगारी समूळ नष्ट करण्यासाठी गौरी गणपतीच्या निमित्ताने आपल्याला संधी मिळाली आणि या संधीचे सोने करण्यासाठी व लोकांमध्ये cyber security awareness बाबतीत जनप्रबोधन होण्यासाठी हा उपक्रम घेतल्याची माहिती माध्यमांना दिली. ऋतुजा बिडकर हिच्या या उपक्रमासाठी तिच्या आई-वडिलांनी ही तिला सर्वतोपरी मदत केली. आणि हा उपक्रम यशस्वी केला.